निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/११/२०२४/0561 दिनांक: ०५.०९.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ११.०७.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | १९.०७.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २०.०८.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काडल्याचा दिनांक | : | ०५.०९.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

अपील क्र. ११/२०२४

श्री. जगनसिंह राजपूत ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.०७.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ११.०७.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक १०.०७.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९.०७.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक १९.०८.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०८.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक २२.०८.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक ३०.०८.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ३०.०८.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी झाले परंतु जन माहिती अधिकारी यांची वैयक्तिक वैद्यकीय अडचण उद्भवल्यामुळे ते हजर राहू शकत नाहीत असे कळविले आहे. सुनावणी दरम्यान आपीलार्थी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-

मागीतलेली माहिती :

१. आपल्या राज्यामध्ये ग्राहकाचा वापर औद्योगिक आहे तर वाणिज्य वापर टेरिफ यूनिट बिल घेऊ शकत असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
२. आपल्या राज्यामध्ये शेती पंप वापर असताना त्याला घरगुती वीज कनेक्शन देऊन घरगुती टेरिफ यूनिटचे बिल घेण्याचा अधिकार विज वितरण कंपनी म. रा. ला घेण्याचा अधिकार असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
३. आपल्या राज्यामध्ये ग्राहकाचा औद्योगिक वापर असताना वाणिज्य टेरिफ यूनिट बिल घेण्यात आले असल्यास विज वितरण कंपनी म. रा. वर कोणती कारवाई ग्राहक संरक्षण अधिन करता येते त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
४. आपल्या राज्यामध्ये एक औद्योगिक कामगाराकडून त्याच्या नावे बिल नसताना व भाडेकरू नसताना दोन लाख रुपये विज वितरण कंपनी अधिकाऱ्याने भरून घेतले त्या कामगाराने डि डि द्वारे पैसे भरले असता त्या कामगारांवर अन्याय झाला म्हणून सदर अधिकाऱ्यावर कोणती कारवाईची तरतूद आहे त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
५. आपल्या राज्यामध्ये वितरण कंपनी म. रा. च्या अधिकाऱ्याने नॉन एक्सप्रेस बिलावर असताना एक्सप्रेस फीडर म्हणून नोंद केली व यूनिट १०.६२ च्या जागी ११.१५ घेतले तर व्यापार व ग्राहक न्यायदृष्टीने जेव्हापासून यूनिट रेट जास्त घेतली तेव्हापासून ग्राहकाला परत करणे बंधनकारक असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:

१. मुद्दा क्रमांक १, २ आणि ४ मधील विचारलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही.
२. मुद्दा क्रमांक ३ आणि ५ साठी संबंधित माहिती महाराष्ट्र विद्युत नियमक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी यंत्रणा प्रदान करतात, ज्यात विज दर वर्गवारीशी संबंधित तक्रारींचा समावेश आहे. सदर विनियमाची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:

माहिती उपलब्ध केली नाही.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

मुद्दा क्रमांक १, २ आणि ४ मधील विचारलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे.

मुद्दा क्रमांक ३ आणि ५ मधील माहिती विज ग्राहकांच्या तक्रारी संबंधी असल्याची आढळून येत आहे. महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाने ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी मविनिआ (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० अंतर्गत मंच उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी संबंधी अर्ज योग्य मंचासमोर सादर करण्यासाठी सूचना देण्यात येत आहे.

त्यानुसार सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, 13 वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- 400032 येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नंबर ४, उल्हासनगर – १
जि. ठाणे. पिन – ४२१००१.

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई